## प्रकरण 1
## 1980 पूर्व मराठी कवितेचे स्वरुप आणि वाटचाल

प्रस्तुत कवितेत अरुण काळे यांच्या कवितेचा अभ्यास 'रॉकगार्डन' (1993), 'सायनरचे शहर' (1997) आणि ''नंतर आलेले लोक' (2006) या तीन कवितासंग्रहाच्या अनुषंगाने मांडण्याचा हेतू आहे. अरुण काळे यांच्या कवितेचा अभ्यास करुन या कवितांचे वेगळेपण शोधणे या हेतूने प्रस्तुत अभ्यास करण्याचे योजले आहे. 1980 नंतरच्या काळातील अरुण काळे हे महत्त्वाचे कवी आहेत. त्यांच्या कवितेमुळे दलित कविता वेगळ्या वळणावर येऊन पोचली. अरुण काळे यांची कविता अधिक वैशिष्ट्यपूर्ण, गुणवत्तापूर्ण आणि एकूण मराठी कवितेला नवे भान देणारी आहे असे वाटते. त्यांच्या कवितेमुळे मराठी साहित्याला जे नवे आत्मभान प्राप्त झाले त्याची चिकित्सा या अभ्यासाच्या निमित्ताने करता येणार आहे. अरुण काळे यांच्या कवितेतील आशयसूत्रे, आविष्कारतंत्रे आणि कवितेची भाषा व शैली विचारात घेवून त्यांच्या कवितेच्या वेगळेणाचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेत करावयाचा आहे. प्रस्तुत अभ्यास मांडण्याआगोदर कविता या वाङमय प्रकाराचे स्वरुप समजून घेणे महत्त्वाचे ठरते. भाषेला मानवी समाजात खूप महत्त्व आहे. मानवी समाज आणि भाषा यांचा संबंध खूप जवळचा आहे. मानवी समाजात भाषा ही बोली भाषेचे काम करीत असते. भाषा ही एकमेकांचे विचार आणि भावभावना यांचे सुलभीकरण करीत असते. कवितेचा जन्म मुळी भाषेबरोबर झालेला आहे अशी एक मानववंशशास्त्रीय उपपत्ती मानण्यात येते. प्राचीन काळी धर्म संस्कृती या मानवी गरजेचे घटक कवितेने व्यापून टाकलेली दिसतात. प्राचीन काळात कवीला खूप महत्त्व होते. कवी म्हणजे समाजातील सर्वात 'द्रष्टा' अशा अर्थाने कवीला मान्यता होती. कवी म्ह समाज्णजे ातील अधिकारी किंवा जाणकार मानला जात असे. माणसाच्या मुलभूत गरजा कवितेशी जोडल्या गेल्या. मराठी भाषेत लिखित स्वरुपातील कविता या रचनाप्रकाराला सातशे वर्षांची दीर्घ परंपरा आहे. मराठी भाषेत कविता ही अनेक रुपांतून अवतरलेली दिसून येते. कवितेचां म्हणी, उखाण्यातून मोठ्या प्रमाणात वापर

होवू लागला. त्याचबरोबर मराठी कविता ही पोवाडा, कटाव, खंडकाव्य, ओवी, अभंग, लावणी, सुनीत, गझल अशा वेगवेगळ्या प्रकारांनी मांडलेली आहे.

कविता ही एक भाषिक संरचना आहे. पण कवितेची निश्चित अशी व्याख्या करणे अवघड काम आहे. कवितेच्या व्याख्येविषयी दिलीप पुरुषोत्तम चित्रे म्हणतात, "निव्वळ शब्दकृती म्हणजे कविता नव्हे. तर त्या शब्दकृतीचे विशेष संकेतांना अनुसरुन केलेले रुपांतर म्हणजे कविता होय. कविता ही भाषेतील भाषा असल्यामुळे कवितेची व्याख्या शोधणे अवघड आहे."[1]

कविता म्हणजे विशिष्ट पध्दतीने लिहिलेल्या किंवा छापलेल्या शब्दांच्या ओळी असे म्हणता येणार नाही. कवितेच्या दृश्य रुप आकारापेक्षा कविता आस्वादताना, वाचताना किंवा ऐकताना विशिष्ट अनुभव येतो त्या अर्थाने कविता ही कविता म्हणून स्वीकारली जाते. या संदर्भात सुधीर रसाळ म्हणतात, "कवितेला स्वत:चे वाचकाच्या आकलनावर अवलंबून नसणारे, असे एक रुप असते, ते अशा प्रकारचे असते की ते वाचकाच्या आकलनकक्षेत गेल्यावर त्या रुपाचा भिन्न भिन्न अन्वयार्थ लावला जाऊ शकतो; ते वाचकांना वेगवेगळ्या स्वरुपांत जाणवू शकते;. त्यामुळे त्याच्या मूल्यमापनातही भिन्नता दिसून येते, या रुपाबद्दल ही जी भिन्नता उद्‌भवते ती स्वैर स्वरुपाची नसते. तिच्याबद्दल घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक भूमिकेत त्या वस्तूच्या सामग्रीचा आधार घेतला जातो-ही कवितेबद्दलची वस्तुस्थिती आहे."[2] रसाळांचे हे म्हणणे पटते.

कविता ज्या घटनेचे वर्णन करते त्या घटनेपलिकडचा कोणताही आशय ती सूचित करते. कविता म्हणजे कवीचा अनुभव किंवा कविता म्हणजे वाचकाचा अनुभव. त्या दृष्टिकोनातून कविता म्हणजे काय ? याचा विचार केला तरीही कवितेचे स्वत:चे असे स्वतंत्र अस्तित्व उरते. कारण कवीची कविता आणि वाचकाने अर्थ लावलेली कविता याशिवाय कवितेची स्वतंत्र ओळख आणि अस्तित्व आपल्याला जाणवते. कविता ही भावना प्रकट करणारी भाषा आहे. भावना जागृत करणे हेच कवितेचे उद्दिष्ट्य असते. कविता ही शब्दांनी

बनलेली असते. कवितेत मुख्य शब्दाला अधोरेखित केले जाते. कविता ही छंद, लय, वृत्त या शैलीत असते. कवितेत शब्दांना मर्यादा नसते. कवितेतून कवीची जीवनशीलता व्यक्त होत असते. कवितेत प्रतिमा-प्रतीकांचा वापर होत असतो. कविता म्हणजे प्रतिभांचीच सेंद्रिय रचना असते. कविता ही अशा अनेक वैशिष्ट्यांनीयुक्त असते. निव्वळ शब्दापुढे शब्द मांडून भावनांचे आविष्कारण करता येत नाही. कधीकधी त्यासाठी नेहमीच्या भाषेची मोडतोड करावी लागते. कवितेत फक्त वाच्यार्थ महत्त्वाचा नाही तर सूचितार्थ किंवा ध्वन्यर्थ क्षमताही अधिक महत्त्वाची असते. वसंत आबाजी डहाके कवितेची व्यवच्छेदक लक्षणे सांगतात ती अशी: "एकंदरीत सातशे वर्षातील कविता पाहिली तर काही गोष्टी लक्षात येतात त्या अशा : कवितेत शब्द असतात, त्यांची मांडणी काही एका क्रमानुसार केलेली असते. अशा ओळी गद्य वाक्याप्रमाणे कर्ता, कर्म, क्रियापद अशा नसतात. कधी कर्ता, कर्म तर कधी क्रियापद अध्याहृत असते. कवितेत शब्दांच्या नादाला अधोरेखित केलेले असते. ओळींमध्ये लय असते, एकापुढे एक ठेवलेल्या शब्दांच्या अनुक्रमांतून लय उत्पन्न होते. कविता छंदात, वृत्तांत मुक्तशैलीत असते, कवितेतून एखादी कथा सांगितलेली असते, विचार सांगितलेला असतो, भावं व्यक्त झालेला असतो, भावनांची अभिव्यक्ती झालेली असते, स्थितीचे चित्रण केलेले असते, प्रसंग मूर्त केलेला असतो, घटना प्रसंगावरचे भाष्य असते, श्रोत्यांना / वाचकांना आवाहन असते, कवितेत अलंकार, प्रतिमा, प्रतीके असतात. प्रत्येक कवितेतून कवीचा, निवेदकाचा स्वर ऐकू येत असतो, कवितेतून कवीची जीवनदृष्टी व्यक्त होत असते. कवितेचे आकारमान एका ओळीपासून अनेक ओळींपर्यंत असू शकते म्हणजे एका ओळीची कविता असते. पंधरा हजार ओळींची कविता असते. ओळींच्या संख्येवरुनही कविता एका ओळीची असणे शक्य आहे तसे कथा-कादंबरी अथवा नाटक यांच्या बाबतीत म्हणता येत नाही.
कविताखेरीजच्या इतर साहित्यप्रकारांचा शाब्दिक विस्तार कमी करीत आणला तरी एका ओळीची कथा- कादंबरी अथवा नाटक आकारात नाही. दुसऱ्या वाक्याची गरज असतेच. कवितेत संगीत, नाट्य आणि या कलांमधून आलेले गुणविशेष आढळतात."[३]

अशा प्रकारे आपण कवितेच्या स्वरुपाचा शोध घेताना कवितेतील शब्दांचा वापर, लय, छंद, नाद, भाषा, उच्चार, प्रतिमा-प्रतीकांचा वापर, विशेषणे, अलंकार या गोष्टींचा थोडक्यात आढावा घेतला.

आधुनिक मराठी कवितेतील वाटचाल केशवसुतांपासुन सुरुवात झाली. असे म्हटले जाते. हा मुद्दा बहुतांश खरा असला तरी केशवसुतांच्या आधी महात्मा जोतिबा फुले यांच्या साहित्यात पर्यायाने कवितेत काही प्रमाणात आधुनिकता बघावयास मिळते. साधारणपणे फुल्यांचा कालखंड हा अव्वल इंग्रजी कालखंड म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रातील सुधारणावाद्यांनी इंग्रजीचा परिचय घडत होता. समताप्रधान समाजनिर्मितीचे ध्येय साध्य करण्यासाठी धर्म-वर्ण-जाती यांच्यावर आधारित व्यवस्थेवर त्यांनी कडाडून हल्ला केला. समाजाची सुधारणांची गरज आणि त्यांचे भान अशा दोन पातळ्यांवर महात्मा फुल्यांनी विचार प्रणाली आपल्या साहित्यातून प्रकट केले आणि यांतुन मराठी कवितेत खूप मोलाची भर टाकली. आधुनिक मराठी कवितेला एक नवे वळण दिले. गो.म.कुलकर्णी म्हणतात, “या काळातील आधुनिक मराठी ललितसाहित्यापुरता विचार करता , या साहित्याने आगरकर आणि टिळक या दोहोंच्याही विचारांचे संतुलन ललितसाहित्यातून साधलेले दिसते. हरिभाऊंची सामाजिक आणि ऐतिहासिक कादंबरी, केशवसुत- गोविंदाग्रज - बालकवी यांचे कवितालेखन ,किर्लोस्कर-देवलांची नाटके इत्यादिंच्या या अनुरोधाने विचार केल्यास, या लेखकांच्या प्रकृतीत राष्ट्रवाद व सुधारणावाद यांचे संतुलन आढळते. स्थूलमानाने असे म्हणता येईल की तत्कालीन वैचारिक गद्यावर लोकमान्य टिळकांच्यां विचारांचा अधिक पगडा आहे, तर ललित साहित्यावर आगरकरांचा.”[4]

अर्वाचीन मराठी कवितेचा प्रारंभ केशवसुतांपासून समजण्यात येतो. इंग्रजांच्या काळातील व इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे मराठी कवितेत बदल झाले. मराठी कवितेत नवा जोम,नवी दृष्टी व नव्या कल्पना दिसू लागल्या. त्यामुळे हा कालखंड आधुनिक मराठी कवितेचा महत्वाचा आहे. हा काळ अव्वल इंग्रजी कालखंड म्हणून ओळखला जातो.

केशवसुतांच्या कवितेपासून मराठी कवितेला एक वेगळी जाणीव झालेली दिसते. केशवसुतांनी मराठी कवितेत नवनवीन काव्यप्रकारांचा वापर केला. मराठी कवितेत प्रेम, निसर्ग आणि सामाजिक विचार दिसू लागले. त्यामुळे मराठी कवितेत खूप मोठे परिवर्तन घडून आले. केशवसुतांनी मराठी कवितेत अनेक प्रयोग केले. केशवसुतांच्या कविताविषयक मांडणीचे वेगळेपण सांगताना म.सु.पाटील म्हणतात. ‘‘केशवसुतांनी काव्यविषयक संकेताना ही काव्यलेखनाच्या अगदी आरंभीच्या काळापासून आव्हान द्यायला सुरुवात केलेली दिसते. कविता ‘अशी असावी’ आणि ‘तशी नसावी’ असे कवीला सांगणारे तुम्ही कोण, असा प्रश्न त्यांनी या काळात विचारुन पारंपरिक दृष्टीला धक्का दिलेला आहे. रसिकांचे केवळ रंजन करणाऱ्या, त्यांना हवे ते देऊन टाळ्या घेणाऱ्या कवितेची त्यांनी हेटाळणी केली आहे. पढीक बोल बोलणारी कविताही त्यांनी नाकारली आहे. हा एक प्रकारे त्यांच्या काळांतील पारंपरिक कवितेला त्यांनी दिलेला नकार आहे.’’[5]

केशवसुतांचे आधुनिक मराठी कवितेतील योगदान खूप मोठे आहे. त्यांनी स्वत: कवितेचे शास्त्र निर्माण केले. त्याचा खूप मोठा प्रभाव समकालीन कवितेवर पडलेला दिसून येतो.

पुढील काळात महत्वाचे काव्यलेखन करणाऱ्यांमध्ये ए.पां.रेंदाळकर,बालकवी,माधव जुलीयन,भा.रा.तांबे,साने गुरुजी,मनमोहन नातू,बा.भ. बोरकर,बहिणाबाई चौधरी,कुसुमाग्रज यांची नावे घेता येतील. मनमोहन नातू यांच्यामध्ये संघर्षाची विद्रोही स्वभावीकृती होती. बा.भ बोरकर यांच्या कवितेत कमालीची भावनीयता दिसते त्यांच्या कवितेतून प्रेम आणि निसर्गाचे प्रकटीकरण दिसते. निसर्गाच्या मदतीने घडवलेला भावनाशीलतेचा आविष्कार ही त्यांच्या कवितेची बाजू आहे. कुसुमाग्रजांनी आधुनिक मराठी कवितेला शक्ती व मर्यादा यांची दिशा दाखवून दिली. बहिणाबाई चौधरी यांची कविता 1920 नंतरच्या ग्रामीण जीवनाचा ठळक आलेख आहे. असे मानता येईल. दुसऱ्या महायुध्दोत्तर काळात लिहिलेल्या कवितेतून नोकर वर्गाचा जीवनपट आकारास आलेला दिसून येतो. स्वत:चे आणि मानवी जीवनाच्या अवस्थांचे

वर्णन बा.सी.मर्ढेकर या महत्वाच्या कवीच्या कवितेतून प्रकट झालेले आहे. कवितेची भाषा ,आशय या बाबतीत या कवितेत विविधता दिसून येते. वास्तवात झपाट्याने बदल झाल्याने मर्ढेकरांच्या जाणिवेत बदल झालेले दिसून येतात. मर्ढेकरांच्या कवितांनी मराठी कवितेत केशवसुतासारखे बदल घडवून आणले. मर्ढेकरांच्या कवितेने मराठी कवितेचा चेहरा - मोहराच बदलून टाकला. केशवसुतांप्रमाणे मर्ढेकरांना अर्वाचीन कवितेपासून प्रेरणा मिळाली. केशव सद्रे म्हणतात. ''मराठीतील पूर्वीची स्वच्छंदवादी कविता सामान्यत: वाचकाच्या अपेक्षा पूर्ण करीत, त्याचा अनुनय करीत व वाचकाला एकप्रकारे हवीहवीशी वाटणारी गुंगी आणीत पुढे सरकत असे, नंतर कवितेच्या शेवटी एखादा 'गोड' धक्का बसला की ,वाचक खूष होऊन कवितेच्या 'छानपणा' ला दादही देत असे. मर्ढेकरांनी मात्र वाचकाला बौध्दिकदृष्टया सतत जागृतच नव्हे तर सतर्क राहायला लावले, वाचकाचा अनुनय करण्याचे नाकारले.''[6] दुसऱ्या महायुध्दाच्या आसपासच्या कालखंडात महाराष्ट्रात साम्यवादी विचारांची लाट ऊसळली. विंदा करंदीकर, शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्याबरोबरच अमर शेख, अण्णाभाऊ साठे, नारायण सुर्वे, बाबा आमटे इत्यादी कवींनी सामाजिक विषमतेबद्दलचे दु:ख प्रकट केले. सभोवतालच्या विषम परिस्थितीची तीव्र जाणीव त्यांच्या कवितेतून मांडली गेली आणि एका नव्या पर्यावरणाला सुरुवात झाली.

मर्ढेकरोत्तर कालखंडात लघुनियतकालिकांची चळवळ जोमाने पुढे आली. यात कवी अरुण कोल्हटकर, दिलीप चित्रे, अशोक शहाणे, मनोहर ओक, वसंत आबाजी डहाके, भालचंद्र नेमाडे, नामदेव ढसाळ, सतीश काळसेकर इत्यादिंची कामगिरी खूप मोलाची आहे. त्यामुळे ही कविता वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचबरोबरच विद्रोही जाणिवाही उमटलेल्या दिसतात. साहित्य, समाज, राजकारण अशा सर्व क्षेत्रात विद्रोहाची कविता निर्माण झालेली दिसून येते. विद्रोह ही जागृतीची जाणीव आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून क्रांतिकारी प्रेरणा घेवून क्रांतिकारी युगाला सुरुवात झाली. या क्रांतिकार्याच्या उत्कर्षबिंदू 1956

साली धर्मांतराच्या वेळी गाठला गेला. या दरम्यान दलित नवशिक्षितांची शिकलेली पिढी बाहेर पडू लागली. जातीव्यवस्थेतून वाट्याला आलेली अवहेलना या पिढीने बेभानपणे आपल्या साहित्यातून मांडायला सुरुवात केली. 1960 च्या दरम्यान दलितांमधून कवींचा खूप मोठा वर्ग समोर आला. मराठी कवितेत एका नव्या परंपरेला सुरुवात झाली. बी.रंगराव म्हणतात त्याप्रमाणे, "चळवळीच्या माध्यमातून निर्माण झालेली दलित कवींची पहिली पिढी ही 1960 च्या दशकातील प्रखर आंबेडकरी जाणिवेने पेटलेल्या या कवी-लेखकांना पूर्वायुष्यातील अस्पृश्यता, दारिद्र्य, अंधार, अंध:कार यांचा वारसा लाभलेला होता. साहजिकच त्यांच्या कवितेत आढळणारा नव्या जाणिवेचा आविष्कार, राग,चीड, दु:ख आणि विद्रोह या भावनांनी ओतप्रोत होता. पूर्वायुष्यातील आठवणींना उजाळा देणारी ही कविता अनेकदा शोकांतिकेच्या उंचीपर्यंत पोहचली व त्याचवेळी शोकांतिकेला कारणीभूत ठरलेल्या समाजविघातक रुढींविरुध्द आव्हानात्मक भूमिका घेऊन त्यांना नष्ट करण्याची भाषाही बोलू लागली. दलित साहित्य व कविता यांच्या चळवळीची त्या काळी तीन प्रमुख केंद्रे हाती. मुंबई, औरंगाबाद नागपूर या तीन प्रमुख शहरात दलित साहित्यसंमेलने, काव्यचर्चा घडून समीक्षेचे नवे सिध्दान्त यावर सतत विचारविनिमय होत असत. या तीन प्रमुख केंद्राव्यतिरीक्त अनेक लहान-लहान शहरात, तालुक्याच्या ठिकाणी नव्या विद्रोही आंबेडकरी जाणिवेच्या कवितेचे लोण पोहचले होते. या पिढीतील कवींपैकी अनेकांनी ग्रामीण, दरिद्री जीवनाचा अनुभव घेतला होता. खेड्यांमधील दाहक जातीवाद, अज्ञान, असहाय्यता यांचीही त्यांना सखोल जाण होती. या सर्व बाबी या कवींच्या कवितेतून प्रभावीपणे व्यक्त होऊन ग्रामीण दलित जीवनाचा सुस्पष्ट आलेख उभा करतात. अस्पृश्यतेचे किळसवाने व भयावह रुप या पिढीतील अनेक दलित कवींनी प्रभावीपणे रेखाटले आहे."[7]

दारिद्र्य,दैन्य,दु:ख,अस्पृश्यता या साऱ्यांनी पोळून निघालेल्या मनाचे आर्त आक्रंदन हा दलित कवितेचा मुख्य सूर आहे. बाबूराव बाबूल, वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, ज.वि.पवार, अर्जुन डांगळे, दया पवार, प्रकाश जाधव

इत्यादी महत्त्वाच्या दलित कवींच्या कवितेत स्वत:वरील समग्र विश्वासाची प्रखरता अधोरेखित झालेली आहे. ''नारायण सुर्वे यांच्या बंडखोरीमुळे विषमतेविरुध्दच्या विद्रोहामुळे नंतरच्या कालखंडात विद्रोही कविता निर्माण झाली ती दलित कविता या नावाने ओळखली जावू लागली. दलित कवितेने आपल्या प्रेरणास्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत. असे म्हटले तरी नारायण सुर्वे यांनी दिग्दर्शित केलेल्या नव्या वाटेचे मोल काही कमी होत नाही.''[8] कोत्तापल्लेंचे हे म्हणणे मान्य करावेसे वाटते. 1980 नंतरच्या दलित कवितेत भुजंग मेश्राम, लोकनाथ यशवंत, लहू कानडे, प्रज्ञा लोखंडे, महेंद्र भवरे इत्यादी कवीनी महत्वपूर्ण काव्यलेखन केलेले आहे.

अरुण काळे हे 1980 नंतरच्या कालखंडात पुढे आलेले कवी आहेत.अरुण काळे यांनी आपले काव्यलेखन 1976 ला सुरु केले.त्यांचे आतापर्यंत 'रॉकगार्डन', 'सायरनचे शहर', 'नंतर आलेले लोक' हे तीन कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. काळेंची कविता तिच्या वैशिष्ट्यपूर्णतेमुळे अधिक उठून दिसणारी आहे. दलित कविता ही आज नव्या वळणावर उभी आहे. दलित कवितेत अरुण काळे यांच्या कवितेचे योगदान मोठे असल्याचे दिसते. काळे यांच्या कविता या मानवी जीवनावर आधारित कविता आहेत. काळे यांच्या कवितेतून महानगरीय जीवनातील दंगलीचे, दहशतीचे, दडपशाहीचे भयकारी दर्शन घडून येते. त्यामुळे दलित कवितेला नवी दिशा मिळाली आहे. अरुण काळे यांच्या कवितेने मराठी साहित्यात मोलाची भर टाकली आहे. त्यांच्या कवितेने मराठी कविता परंपरेला नवे भान दिल्याचे जाणवते. नव्वद नंतरच्या नव्या मराठी कवितेची समृध्दी कळून येण्यासाठी अरुण काळेंची कविता समजणे महत्त्वाचे वाटते. त्यांच्या कवितेत आशयसूत्रे, आविष्कारतंत्रे आणि भाषाशैली याबाबत नवनवे प्रयोग झालेले आहेत. काळे यांची कविता ही आंबेडकरीय विचाराचे, स्त्रीजीवनाचे, महानगरीय जीवनाचे, आर्थिक शोषण झालेल्या श्रमजीवी वर्गाचे आणि माणसाच्या विध्वंसक रुपाचे दर्शन घडवते. दलित कविता ही नव्या जोमाने उभी आहे कारण अरुण काळे सारखे कवी दलित कवितेला लाभलेले आहेत. 1980 पूर्व मराठी कवितेचे

स्वरुप आणि वाटचाल करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यामुळे मराठी कवितेला एक वेगळी दिशा प्राप्त झाली आहे.

'1980 पूर्व मराठी कवितेचे स्वरुप आणि वाटचाल' या प्रस्तुत प्रकरणात कविता या वाङमय प्रकाराची संकल्पना आणि जडण घडण स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**सारांश :**

या प्रकरणात कवितेचे स्वरुप आणि वाटचाल यांचा अभ्यास समग्रपणे केला. या प्रकरणात कवितेची व्याख्या, कवितेचे स्वरुप, कवितेची वाटचाल व कवितेतील प्रयोग इत्यादी गोष्टी स्पष्ट केल्या. सातशे वर्षाची परंपरा लाभलेल्या मराठी काव्यरचना वेगवेगळ्या प्रकारांनी सजलेली आहे. या काव्यरचनेत वेगवेगळी कथाकाव्ये दिसतात. त्याचबरोबर भावकवितेचे प्रकारही दिसून येतात. कवितेची निश्चित व्याख्या करणे अवघड असते. कवित ही अनेक शब्दांनी निर्माण झालेली असते. कविता ही अनेक अर्थ सूचित करीत असते. कवितेला स्वत:ची वेगळी शैली असते.

आधुनिक कवितेची वाटचालीची सुरुवात ही केशवसुतांपासून झाली. त्यांच्या अगोदर महात्मा जोतिबा फुले यांनीही मराठी कवितेत वेगळे वळण, दिशा निर्माण केली. महात्मा जोतिबा फुले यांनी मराठी कवितेला एक वेगळी जाणीव निर्माण करुन दिली. त्यामुळे मराठी कवितेत वेगवेगळे बदल घडून आले म्हणून मराठी कवितेचा विकास झालेला दिसतो. पुढील काळात बहिणाबाई, मर्ढेकर, सुर्वे आणि दलित काव्याने एकूणच मराठी कवितेचा विस्तार केला. 1980 नंतरच्या कवितेवर या सर्व कवींचा कमी अधिक प्रमाणात प्रभाव आहे.

## संदर्भ

1. चित्रे दिलीप पुरुषोत्तम, 'कविता', *साहित्य*, मुंबई, मराठी साहित्य संघ, 1958 पृ.1

2. रसाळ सुधीर, *कविता आणि प्रतिमा*, मुंबई मौज प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, ऑक्टोंबर 2002 पृ. 33

3. वसंत आबाजी डहाके, *कवितेविषयी*, औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, प्रथम आवृत्ती, जुलै 1984, पृ.4

4. गो.म. कुलकर्णी, *आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी*, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथम आवृत्ती, 1994, पृ. 95

5. म.सु. पाटील, *कवितेचा रुपशोध*, श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, पहिली आवृत्ती, 1999, पृ.90

6. केशव सद्रे, *कवितेतील आधुनिकवाद*, श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, पहिली आवृत्ती, जानेवारी 2000, पृ. 179

7. बी.रंगराव ( संपादन ), *मराठी दलित कविता*, मुंबई, साहित्य अकादेमी, पुनर्मुद्रण, 2007, पृ.8

8. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, *आधुनिक मराठी कविता : एक दृष्टिक्षेप*, परभणी-प्रतिभास प्रकाशन, प्रथमावृत्ती, जानेवारी 1999, पृ. 100